जय भगवान सेवाभावी संस्था धर्मापुरी संचिलत,

कै. शंकरराव गुट्टे ग्रामीण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धर्मापुरी ता. परळी वै. जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित

# राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

# दलित साहित्य व समकालीन समाज


## संपादक

प्रा. केशव एस. कातकडे

## सह संपादक

प्रा. आर. के. गजलवार


## आयोजक


मराठी विभाग

कै. शंकरराव गुट्टे ग्रामीण कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

धर्मापुरी, ता. परळी वै. जि. बीड - 431517

कायम संलग्नित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

Ph. No. 02446 - 254117

Email - ksgcollege123@gmail.com,guttecollege1999@gmail.com

w.w.w. guttecollege. in

ISBN : 978-93-85162-89-3

- दलित साहित्य व समकालीन समाज

- **संपादक**
  **प्रा. केशव एस. कातकडे**

© **प्राचार्य,**
**कै. शंकरराव गुट्टे ग्रामीण कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धर्मापुरी, जि. बीड**

- **प्रकाशक**
  **ज्योतीचंद्र पब्लिकेशन, लातूर, जि. लातूर**
  **०२३८२-२४११९३ (०९४२३३४६१९३, ०९५०३८१४०००)**

- **अक्षर जुळवणी**
  **विकास ढमाले**

- **मुखपृष्ठ**
  **विकास ढमाले**

- **मुद्रण**
  **ज्योतीचंद्र पब्लिकेशन,**
  **लातूर, जि. लातूर.**

**नोट :-** या पुस्तकामध्ये प्रकाशीत करण्यात आलेल्या शोधनिबंधातील मते ही त्या-त्या लेखकांची वैयक्तिक असून त्याबाबत संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.

| अ. क्र | शोध आलेख शिर्षक | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| 30 | बाबुराव बागुल यांच्या कथेतील स्त्रीजीवन आणि भूमिका | डॉ. दादाराव गुंडरे | 97 |
| 31 | आजची दलित कथा : स्वरुप व वास्तव | शशिकांत श्रीरंग जाधवर | 104 |
| 32 | दलित कवितेतील समाज चित्रण | के. एस. कातकडे, अनिता द. वाळके, गजानन दराडे | 109 |
| 33 | आंबेडकरवादी कवितेतील वेदना, विद्रोह व नकार | भास्कर विठ्ठलराव नरवाडे | 113 |
| 34 | दलित साहित्यातून चित्रीत झालेले सामाजिक वास्तव | रमेश बाबासाहेब रिंगणे | 118 |
| 35 | दलित साहित्यातील विद्रोह आणि सामाजिक मूल्ये | बी. पी. रुद्देवाड | 121 |
| 36 | अण्णाभाऊंच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा | एन.एस. उदार | 124 |
| 37 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून चित्रित झालेले सामाजिक जीवन | डॉ. उमेश चांगदेव मुंढे | 126 |
| 38 | विद्रोही दलित कथेचे शिल्पकार बाबुराव बागूल | श्रीमती सरला वासुदेव गोरे, डॉ. व्ही. एन. पाटील | 131 |

34

# दलित साहित्यातून चित्रीत झालेले सामाजिक वास्तव

**रमेश बाबासाहेब रिंगणे**
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर गढी, जि.बीड

माणुस जसजसा मोठा होऊ लागतो तस तसा त्याचा समाजाशी जवळचा संबंध येऊ लागतो. आणि कळत्या वयात, जाणत्या मनात अनेक प्रश्न उभे राहू लागतात. उभ्या असणाज्या प्रश्नांना भिडतांना या समाजाच्या अनेक धारणा, कल्पना, समजुती समजून घेता घेता वास्तवाचे अनेक धागे त्याच्या हाताशी लागतात आणि स्वत:च्या अनुभवावर तो त्याला पारखून घेतो व स्वत:चे व्यक्तीत्व, स्वत:चे विश्व तयार होत जाते. ही प्रक्रिया जशी माणसाच्या पातळीवर घडताना दिसते तशीच सहित्याच्या बावतीत सुध्दा घडते. असे मला वाटते किंवा मराठी साहित्याच्या बावतीत तरी तसेच घडले आहे असे म्हणावेसे वाटते.

मराठी साहित्य अनेक पातळ्यावरुन जसे अध्यात्म, धर्मनिरुपण, प्रबोधनात्मक, तात्विक, मनोरंजनात्मक, निसर्गात्मक, आकलनात्मक, वैचारिक इथ पासून ते कल्पनात्मक, जीवनात्मक आणि वास्तवाभिमूखते पर्यंत झाले आहे. शिक्षणाची दार सर्वासाठी खुली झाली, शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार जस जसा खालच्या थरापर्यंत पोहचू लागला तसी साहित्य प्रक्रिया वास्तवाकडे जाऊ लागली. स्वातंत्र्यानंतरचा सामाजिक समतेचा लढा या साठी खज्या अर्थाने कारणीभूत झाला. डॉ.वाबासाहेव आंबेडकरांच्या समतेच्या तत्वज्ञाने जागतिक पातळीवर एक नवरचनावाद निर्माण केला, ज्याचा परिणाम मराठी साहित्यावर सुध्दा झाला आणि साठोत्तरी वाङ्‌मयामध्ये दलित साहित्याचा प्रवाह लिहिता बोलता झाला. सर्व समाज, सर्व साहित्य नव्या भूमिकेने आणि निष्ठेने ढवळून निघाले. दलित साहित्याने उपस्थित केलेले प्रश्न केवळ एकमुखी नसून अनेक मुखी आहेत असं म्हणूनच रा.ग.जाधव म्हणतात याच साठोत्तरी काळात दलित साहित्याने परिवर्तनवादी भूमिकेतून स्वीकारलेला मानवतावाद मराठी साहित्याच्या कक्षा व्यापक करतो. समता, मानवता या क्रांतीकारक वदलांमुळे मराठी साहित्यात क्रांती झाली आणि अमुलाग्र असा वदल घडवून आणला.

घटनेची निर्मिती आणि डॉ.बाबासाहेव आंबेडकरांचे धर्मांतर या समग्र क्रांतीला संजीवनी देणारे, वळ देणारे घटना प्रसंग ठरले. दलित साहित्याचा सुध्दा स्वत:चा एक बाज निर्माण झाला. संस्कृतीच्या नीट आकलनात जेव्हा आपण डोकावतो तेंव्हा पिढ्यांन पिढ्या पिचलेला, अज्ञानात अन गुलामीत खितपत पडलेला समाज डोळ्याआड करता येत नाही हीच संकल्पना घेऊन दलित साहित्याने वास्तवाला प्रखरपणे सामोरे जाण्याचे धारिष्ठ्य दाखवले म्हणूनच या काळात गरिव, अस्प्रश्य, श्रमिक, कामगार शेतमजूर आदिवासी, स्त्रिया इ.या सर्व घटकांच्या व्यथा, वेदना शब्द वध्द केल्या. म्हणूनच नामदेव ढसाळ म्हणतात.

''काय काय लिहू
करसं करसं लिहू
कुठल्या संज्ञेत लिहू

भुकेबद्दल कि दारिद्र्या बद्दल
दैन्या बद्दल कि दास्या बद्दल''
छळा बद्दल कि मळा बद्दल''[१]

अनंत काळाचे हे सत्य नामदेव ढसाळ किती परखडपणे आपल्या समोर मांडतात. मराठी साहित्याचे सर्व रुढ नियम बाजूला करुन दलित कविता नामदेव ढसाळांनी बोलता केली. भारतीय संस्कृतीच्या दिखाऊ आणि फसव्या रुढी, आणि विसंगतीने कितीतरी पिढ्यांच्या वाट्याला ज्ञान, समता, न्याय येऊ दिला नाही जे स्वातंत्र्यानंतर दलित साहित्याने प्रकर्षाने साहित्य केंद्री बनवले आणि मराठी साहित्यासह सारे साहित्य हादरुन गेले. बाबुराव बागुल, दया पवार, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, प्र.ई.सोनकांबळे, त्र्यंबक सपकाळे, मधु मंगेश कर्णिक, विभावरी शिरुरकर, श्री.म.माटे इ. नी या एकंदर वृत्ती - प्रवृत्तीला अधोरेखीत केले आणि साठोत्तरी साहित्याने त्यांना प्रवाह बध्द केले.

''दलित साहित्याला हे जे भान आले ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानातून आणि त्यांनी सुरु केलेल्या चळवळीतून आले आहे. म्हणून तो डॉ.आंबेडरांना म्हणजे त्यांच्या तत्वज्ञानाला आणि त्यांच्या मानव मुक्तीसाठी चाललेल्या चळवळीला प्रेरणास्थान मानतो.''[२]

भोगलेल्या अनुभवांची दाहकताच इतकी तीव्र आहे की ज्याने साहित्याची भाषा सुध्दा जहाल व आक्रमक झाली आहे. याच्या पाठीमागे जे जे सोसले आहे त्याची तळमळ, विद्रोहाची प्रखर जाणीव आहे. पण ''हा जीवन विषयक दृष्टिकोन माणसामाणसात समता मानतो. जन्म, वंश, इत्यादीमुळे निर्माण होणाज्या भेदभावांना नकार देतो. माणसाचे माणसाशी न्यायी पणाचे वर्तन असावे अशी अपेक्षा करतो. धर्म, वर्ण, जात इ. मुळे कुणी कुणास बंधनात ठेवता कामा नये.''[३]

संस्कृतीच्या वेगळी संकल्पनांनी वर्षानुवर्षाच्या या सामाजिक विकलांगतेलाच उभा छेद देत दलित साहित्य समोर उभे असते. म.फुले यांच्या मागासलेपणा विषयीचा दृष्टीकोन, बुध्दांचा तत्वविचार तर डॉ.आंबेडकरांचा समता, स्वातंत्र्य व मानवतेसाठीचा लढा ही खरी प्रेरणा दलित साहित्याची आहे. जेणे करुन सामाजिक वास्तवाचे आकलन स्वत:च्या पातळीवर घेत घेत हे लेखक, कवी लिहिते झाले अन मग आत्मभानाच्या एका टोका पासून सुरु झालेलं हे पर्व सामाजिक समतेच्या, वास्तव्याच्या सद्यस्थितीला कवेत घेते. शंकरराव खरात, प्र.इ.सोनकांबळे इ.नी स्वत:च्या आत्मभानाची जी सांगड या व्यवस्थेच्या मुळाशी, रचना बंधाशी घातली आणि वाट्याला आलेले सत्य निर्भयपणे प्रकट केले. म्हणूनच फ.मु.शिंदे म्हणतात माणसाच्या विरोधात असलेले मोडायचं आणि माणसाच्या अनुरोधात पुन्हा ते मांडायचं ही या संघर्षाची आत्मीक भूमिक आहे. (प्रस्तावना - निळ्या पहाडाच्या कविता) हीच भूमिका दलित साहित्याच्या परखडपणाला जन्माला घालते म्हणूनच तर मधल्या काळात याच प्रकृतीला विरोधी म्हणत हिणवण्यात सुध्दा आले. कारण नागरी संवेदना, मध्यमवर्गाचे प्रतिनिधीत्व, मनोरंनात्मक इ.वैशिष्टच्या पुढे फारसे न पोहचलेले मराठी साहित्य या वास्तव धक्याने हवाल दिल झाले आणि समीक्षेच्या ठरवून टाकलेल्या चौकटींना उधळून देऊ लागले. प्र.ई.सोनकांबळे यांचा 'आठवणीतले पक्षी' तला एक एक अनुभव या ठराविक संकेतांना पायदळी तुडवतो आहे आणि माणूसच कसा माणसाला जाणून बुजून या पिढ्यांपिढ्यांच्या दुर्दशेमध्ये ढकलतो, सामाजिक समतेला, मानवतेला कसा नियोजनबध्द अडवतो आहे, हे ठासून सांगतो. तेव्हा वाचकांचे सुध्दा आत्मभान, आत्मबुध्दी गळाल्याशिवाय रहात नाही. रविंद्र घवी म्हणूनच म्हणतात. 'दलित साहित्यात आधुनिक जीवन मुल्यांचे प्रखर भान आहे. व्यक्तिच्या प्रतिष्ठेसाठी आणि सामाजिक समतेसाठी छेडलेल्या संगराची ती जाणिव आहे.

वर्ण विषमता, वर्ग विषमता, धर्मविषमता यांच्या चक्रव्युहात सापडलेला हा समाज खऱ्या अर्थाने मुक्त व्हावा हे सामाजिक वास्तव दलित साहित्य मांडते. स्वातंत्र्य, समता, मानवता व बंधुत्व या सामाजिक मुल्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठीचा संघर्ष हेच दलित साहित्याचे खास नजरेत भरणारे वैशिष्टय ठरते. कविता, नाटक, कादंबरी, कथा, आत्मकथा इ.प्रकारातून परंपरेला नकार दर्शवतच नव्या समतावादी मुल्याची रुजवणूक देखील दलित साहित्य आपला नव्या रुपबंधात करुन दाखवते म्हणूनच मराठी साहित्यामध्ये मानवतावादी मुल्यांचे पडसाद घुमू लागले ते दलित साहित्यातूनच. सामाजिक विषमतेचा वास्तववादी विपर्यास दलित साहित्य रेखाटते. तेव्हाच तुम्हा-आम्हाला वास्तावाचे आणि वास्तवतेचे भान आल्यावाचून रहात नाही.

## संदर्भ सूची :-


१) गोलपिठा नामदेव ढसाळ

२) ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ट क्र.६८

३) उपरोक्त पृष्ट क्र.८५

४) मराठी कविता प्रवृत्ती आणि प्रवाह डॉ.सौ.रामकली पावसकर

५) साठोत्तरी मराठी कविता व कवी रा.ग.जाधव.